| MHOS090011442024 | दाखल दिनांक | :- | ०४/०४/२०२४ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २२/०४/२०२४ | | |
| | निकाल दिनांक | :- | २०/०६/२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०२ | ०१ | २९ |

**भाग अ**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(i) अन्वये]**

**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, (न्यायालय क्र.३) कळंब, ता. कळंब,**

**जि. धाराशिव यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी - अमृता धोंडीराम जाधव)**

न्यायनिर्णय घोषित दिनांक : २०/०६/२०२६

सं. फौजदारी खटला क्र. १९६/२०२४ निशाणी क्र. १६

गुन्हा नोंदणी क्रमांक – ६१/२०२४ पोलीस स्टेशन, कळंब

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, कळंब,<br>ता. कळंब, जि. उस्मानाबाद. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्री. एस. टी. वैद्य |
| **विरुध्द** | |
| आरोपी | पोपट ज्ञानोबा डिकले,<br>वय ४२ वर्षे,<br>रा. तांदुळवाडी, ता. कळंब<br>जि . उस्मानाबाद. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. आर.ए. पाटील |

## भाग ब

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०९/०२/२०२४ |
| गुन्हा दाखल दिनांक | ०९/०२/२०२४ |
| दोषारोप दाखल दिनांक | ०४/०४/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १०/१२/२०२५ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १२/०१/२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | २०/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २०/०६/२०२६ |
| दोषी ठरवल्याचा दिनांक, जर असल्यास | -निरंक- |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| -- | पोपट ज्ञानोबा डिकले, | १०/०२/२४ | १०/०२/२४ रोजी फौ.प्र.सं. कलम ४१(१)(अ) प्रमाणे नोटीस दिली | ६५ (ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा | निर्दोष | -निरंक- | -निरंक- |

## भाग क

[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(iii) अन्वये]

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | ज्योतीराम परशुराम काळे | जप्ती व घटनास्थळ पंच | १४ |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

## अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | १. | अंतिम अहवाल |
| २. | २ | मुद्देमाल यादी |
| ३. | ३ | फेरीस्त |
| ४. | १५ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीस ओळखीपुरते |

## ब. आरोपीतर्फे पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## क. न्यायालयीन पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | रक्कम रु.१,०५०/- किंमतीच्या देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली क्षमतेच्या १५ काचेच्या बाटल्या. |

**गुन्हाः**- महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५ (ई) अन्वये.

## न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक – २० जुन, २०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५ (ई) अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

**<u>सरकार पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-</u>**

२. फिर्यादी आसाराम बन्शी खाडे, पो.कॉ./८३२ नेमणुक, पोलीस स्टेशन, कळंब यांनी दिनांक ०९/०२/२०२४ रोजी पोलीस ठाणे, कळंब येथे फिर्याद दिली की, दिनांक ०९/०२/२०२४ रोजी त्यांच्या वरिष्ठांच्या आदेशानुसार अवैध धंद्यावर कार्यवाही करण्याकरीता ते व त्यांच्यासोबत स.पो.नि. कांबळे, पो.हे.कॉ./५८८ तांबडे, पो.ना./८४ शेख, पो.हे.कॉ./३६९ पतंगे असे इ.नं.३६ वेळ २०.४७ नुसार शासकीय वाहन क्रमांक एम.एच.-२५/ए.डब्लु.-७८४५ ने पेट्रोलिंग करत असताना ते तांदुळवाडी शिवारातील हॉटेल बळीराजा जवळ आले असता त्यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम सदर हॉटेलच्या बाजुस देशी दारुच्या बाटल्या जवळ बाळगुन त्याचा चोरटा विक्री व्यवसाय करीत आहे. त्यावरुन पो.हे.कॉ./३६९ पतंगे यांनी दोन पंचांना बोलावुन घेवुन त्यांना बातमीचा आशय सांगितला. ते पंच म्हणुन येण्यास तयार झाल्यानंतर पोलीस स्टाफ व पंचांसह बातमीच्या ठिकाणी अचानकपणे २२.३५ वा. छापा मारला असता तेथे त्यांना आरोपी मिळुन आला. त्याच्या कब्जातुन एका लाल रंगाच्या कापडी पिशवीमध्ये देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १५ सिलबंद काचेच्या बाटलया एकुण किंमत रक्कम रु.१,०५०/- मिळुन आल्या. सदर मुद्देमालातुन सी.ए. करीता सॅम्पल करीता देशी दारु टँगो पंच कंपनीची एक सिलबंद काचेची बाटली काढुन घेवुन त्यावर पंचांच्या पोलीसांच्या सह्यांचे लेबल लावुन पो.स्टे. चे लाखशिल केले व तसा सविस्तर पंचनामा स.पो.नि. कांबळे यांनी केला. त्यानंतर पोलीस स्टेशनला येवुन त्यांनी आरोपीविरुध्द सदर आशयाची फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीप्रमाणे गुन्हा र. क्र. ६१/२०२४ नोंद झाला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा तयार केला व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तसेच तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम चे कलम ६५ (ई) अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीला निशाणी क्र. १३ वर दोषारोपाचा तपशील समजावून सांगितला. वरील निवेदनाप्रमाणे त्याने गुन्हा कबुल न करता प्रकरण चालविण्याचे

स्विकारले.

**५.** सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ ज्योतीराम परशुराम काळे यांना तपासण्यात आले. त्यानंतर निशाणी क्र.१ खालील आदेशानुसार सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द पुरावा मिळून न आल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन वगळण्यात आले. आरोपीच्या वतीने कोणताही पुरावा दाखल करण्यात आला नाही.

**६.** सरकार पक्षाची कथने व आरोपीचा बचाव पाहता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांचे निष्कर्ष त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणेः-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दिनांक १०/०२/२०२४ रोजी कळंब ते मोहा जाणा-या रोडच्या बाजुस तांदुळवाडी शिवारातील हॉटेल बळीराजाच्या बाजुस आरोपी हा देशी दारु टँगो पंच कंपनीच्या १८० मि.ली. क्षमतेच्या काचेच्या १५ सिलबंद बाटल्या स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी विनापास परवाना बेकायदेशिररित्या चोरटा विक्री व्यवसाय करण्याचे उद्देशाने बाळगल्याच्या अवस्थेत मिळून आला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ साठीः</u>-**

**७.** आरोपीतर्फे विधिज्ञ व सरकार पक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी गुणदोषावर न्यायनिर्णय करणेबाबत युक्तीवाद केला.

८. सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी केवळ एका साक्षीदारास तपासण्यात आले. ज्योतीराम परशुराम काळे, घटनास्थळ पंच (अ.सा.क्र.१) यांच्या साक्षीत असे कथन केले की, त्यांना दिनांक ०९/०२/२०२४ रोजी कळंब पोलीसांनी पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. ते शेतात जात असताना पोलीसांनी त्यांची सही घेतली होती. पंचनाम्यातील मजकुर काय होता हे त्यांना माहीत नाही. घटनास्थळ पंचनाम्यावरील अ.क्र. १ वर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले, परंतु मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे. साक्षीदाराने सरकार पक्षास पाठींबा दिला नाही. त्यांना सरकार पक्षातर्फे उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. तथापी, त्यातुन काहीही निष्पन्न झाले नाही.

९. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने आरोपी हा विनापरवाना बेकायदेशीररित्या उक्त नमुद देशी दारू कब्जात बाळगुन तिचा चोरटा विक्री व्यवसाय करीत असताना मिळून आला हे निःसंशयपणे सिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदार क्र.१ यांनी सरकार पक्षास पाठींबा न दिल्याने सरकार पक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीच्या ताब्यातून जप्त केल्याची बाब संशयापलीक सिध्द करणेकामी अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे.

१०. प्रस्तुत प्रकरणामध्ये सी.ए. अहवाल दाखल आहे. वास्तविक पाहता सदर कायद्यातील तरतूदीप्रमाणे जप्त मुद्देमालाचे रासायनिक पृथक्ककरण जप्तीपासून तत्काळ होणे आवश्यक आहे. प्रस्तूतच्या प्रकरणात जप्त करणेत आलेल्या मुद्देमालाचे पर्यवेक्षण व पृथ्थ्करण हे तात्काळ व मुदतीत होणे आवश्यक होते. परंतू प्रस्तुत प्रकरणात तसे झाल्याचे दिसून येत नाही. तसेच, सदर विलंबाचे स्पष्टीकरण देखील अभियोग पक्षाने दिलेले नाही. मुद्देमाल हा दारू असल्याचे जरी सिध्द होत असले तरी अभियोग पक्षाने तपासलेल्या स्वतंत्र पंच साक्षीदाराने अभियोग पक्षाचे कथनास दुजोरा न दिल्यामुळे कथीत जप्त मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केल्याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर

आणण्यात आणि जप्ती पंचनामा सिध्द करण्यात अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे व त्यामुळे आरोपीविरूध्दचा दोषारोप निसंदे:रित्या सिध्द झालेला नाही. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.२ साठीः</u>-

**११.** एकंदर, मुद्दा क्र. १ वरील कारणमिमांसा व निष्कर्ष बघता अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द केले नसल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. मुद्दा क्र.२ करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१) आरोपी पोपट ज्ञानोबा डिकले, वय ४२ वर्षे, रा. तांदुळवाडी, ता. कळंब, जि. उस्मानाबाद याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) प्रमाणे महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वयेच्या दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ च्या पुर्ततेकामी रक्कम रुपये १५,०००/- चा वैयक्तिक जातमुचलका दाखल करावा.

४) मुद्देमाल पावती (नि.क्र.२) मध्ये वर्णन केलेला मुद्देमाल देशी दारू ही अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, धाराशिव यांच्याकडे पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

**स्वाक्षरीत/-**

**ठिकाण** - कळंब
**दिनांक** - २०/०६/२०२६

**( अमृता धोंडीराम जाधव)**
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
(न्यायालय क्र.३),कळंब.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | -- | Prashant Sunita S. Ovhal, Stenographer (Grade-III) |
| Name of the Court | -- | In the Court of 3rd Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C. Kallam. |
| Date of dictation | -- | 20/06/2026. |
| Order signed by the Presiding Officer on | -- | 20/06/2026. |
| Order uploaded on | -- | 20/06/2026. |